महाराष्ट्र शासन

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, कोल्हापूर

खोली क्र. १६ व १७, दुसरा मजला,

जिल्हा व सत्र न्यायालय, कसबा बावडा, कोल्हापूर

ई–मेल आय.डी. :– **dlsa.dc.klp@gmail.com**

वेबसाईट :– **https://districts.ecourts.gov.in/kolhapur**

दुरध्वनी क्र. ०२३१.२५४१२९५. भ्रमणध्वनी क्र. ८५९१९०३६०९.

जाहिरात – दि. १७/०४/२०२६

अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख – दि. २४/०४/२०२६

कंत्राटी पध्दतीने वाहनचालक (Driver)

कोल्हापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण करिता खालील पद निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने करिता भरावयाचे आहे.

पदाचे नाव व पात्रता

अ. क्र.	पदाचे नाव	संख्या	शैक्षणिक पात्रता (कमीत कमी)	एकत्रित वेतन (सर्व भत्ते मिळून दरमहा)
१	वाहनचालक (Driver)	१	१. उमेदवार कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठातून किमान १२वी पास असावा. २. उमेदवाराकडे जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास व त्यानंतर मोटार वाहन अधिनियम १९८८ (क्र.५९/१९८८) प्रमाणे वैध व कार्यरत असा किमान हलके मोटार वाहन (LMV) चालविण्याचा परवाना असावा. ३. उमेदवाराकडे मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट असावे. ४. कामाचा अनुभव – चारचाकी वाहन चालविण्याचा अनुभव असलेबाबतचे प्रमाणपत्र (उपलब्ध असलेस)	किमान वेतन कायद्यानुसार

अटी व शर्ती

१. सदरचे पद हे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाचे असून फक्त ११ महिने या कालावधीसाठी **कंत्राटी स्वरूपात** भरण्यात येणार आहे. उमेदवाराचा या पदावर नोकरी कायम करणेबाबत कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

२. यासोबत अर्जाचा नमुना दिलेला असून त्या पध्दतीचा अर्ज अर्जदाराने **दिनांक २४/०४/२०२६** रोजी **सायंकाळी ०५:०० वा.** पर्यंत प्रत्यक्ष अथवा स्पीड पोस्टने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, कोल्हापूर या कार्यालयाचे पुढील पत्त्यावर पोहोचतील अशा प्रकारे दाखल करावा. त्यानंतर आलेल्या अर्जाचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

<u>अर्ज दाखल करण्याचा पत्ता :—</u>

मा. सचिवसो, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
खोली क्र. १६ व १७, दुसरा मजला,
जिल्हा व सत्र न्यायालय, कसबा बावडा, कोल्हापूर—४१६ ००६.

३. अर्जावर/पोस्टाच्या लिफाफ्यावर कोणत्या पदाकरिता अर्ज केला आहे ते स्पष्टपणे नमुद करावे, तसे नसल्यास अर्ज अपूर्ण समजून त्याचा विचार केला जाणार नाही.

४. अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेबाबत स्वयंसाक्षांकित प्रती दाखल कराव्यात.

५. अर्जदाराचे वय जाहिरात प्रसिध्द झाल्या तारखेपावेतो २१ वर्षापेक्षा कमी आणि ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे

६. निवड करणेत आलेल्या उमेदवाराने प्राधिकरणाकडे करारनामा लिहून द्यावयाचा आहे.

७. नेमणुकीनंतर उमेदवारास कोणतेही कारण न देता व कोणतेही पूर्व सूचना न देता नोकरीतून कमी करण्याचा अधिकार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास राहिल.

८. उमेदवारास नेमणुकीच्या कालावधीपूर्वी नोकरीस सोडावयाची असल्यास दोन महिन्याचे आगाऊ सूचना किंवा एक महिन्याचा ढोबळ/स्थूल पगार या प्राधिकरणाकडे जमा करावा लागेल.

९. एकत्रित वेतन हे किमान वेतन कायद्यानुसार ठरविल्याप्रमाणे असणार आहे.

१०. उपरोक्त पदाकरिता अर्ज करणेसाठी अर्जदारांकडून कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही.

११. भरती प्रक्रियेच्या माहितीकरिता अर्जदाराने जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांच्या अधिकृत संकेतस्थळ **<u>https://districts.ecourts.gov.in/kolhapur</u>** यास भेट द्यावी.

१२. पात्र उमेदवारांची यादी दिनांक २७/०४/२०२६ इ. रोजी जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांच्या अधिकृत संकेतस्थळ **<u>https://districts.ecourts.gov.in/kolhapur</u>** व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, कोल्हापूर यांच्या सूचना फलकावर जाहिर करणेत येईल.

१३. पात्र उमेदवारांची मोटार वाहन परीक्षा दिनांक २९/०४/२०२६ इ. रोजी सकाळी १०:३०वा. पासून प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयामार्फत घेणेत येईल.

१४. पात्र उमेदवारांची संभाव्य मुलाखत दिनांक २९/०४/२०२६ इ. रोजी सायंकाळी ०५:००वा. मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, कोल्हापूर यांचे निजीकक्षामध्ये घेणेत येईल.

Dphode

(दिपाली डोईफोडे)
सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
कोल्हापूर.

स्थळ : कोल्हापूर.
दिनांक : १७/०४/२०२६

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, कोल्हापूर

....

अंतर्गत

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, कोल्हापूर करिता निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने या कालावधीकरीता वाहनचालक (Driver) या पदासाठी अर्ज करण्याचा नमुना

नुकताच काढलेला पासपोर्ट साईज फोटो

१. अर्जदाराचे संपुर्ण नाव :— ____________________

२. अर्जदाराचे संपुर्ण पत्ता :— ____________________

३. अर्जदाराचे जाहिराती दिवशीचे वय/जन्मतारीख :— ____________________

४. आधार कार्ड क्र. :— ____________________

५. मोबाईल क्र. व ई—मेल आयडी :— ____________________

६. मोटार वाहन चालविण्याचा परवाना क्र. :— ____________________

७. परवान्याच्या वैधतेची तारीख :— ____________________

८. शैक्षणिक अर्हता :—

अ.क्र.	शैक्षणिक अर्हता	बोर्ड/विद्यापीठ	उत्तीर्ण वर्ष	टक्केवारी

८. अनुभव :— ____________________

९. सोबत कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित केलेल्या प्रती जोडणे आवश्यक आहे.

स्थळ :

दिनांक :

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

घोषणापत्र

मी.., वय—........वर्षे, रा. ...., याद्वारे घोषित करतो/करते की, या अर्जामध्ये दिलेली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार व विश्वासानुसार खरी, पूर्ण व अचूक आहे. जर कोणतीही माहिती कोणत्याही टप्प्यावर खोटी किंवा चुकीची आढळल्यास माझी नियुक्ती रद्द करण्यात येऊ शकते. मी हे ही घोषित करतो/करते की, माझ्यावर कोणत्याही न्यायालयात किंवा प्राधिकरणाकडे कोणतीही शिस्तभंगाची कारवाई झालेली नाही. मी प्रामाणिकपणे, निष्ठेने व शिस्तबध्दपणे काम करण्याचे आश्वासन देतो.

स्थळ :
दिनांक :

....
अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

हमीपत्र

मी.., वय—........वर्षे, रा. ...., वाहनचालक पदासाठी अर्जदार, खालीलप्रमाणे विधिवत हमी देतो की,

१. माझ्याविरूध्द कोणत्याही न्यायालयात कोणताही फौजदारी गुन्हा प्रलंबित नाही. तसेच मला कोणत्याही फौजदारी गुन्हयात दोषी ठरविण्यात आलेले नाही.

२. मी माझे वाहन चालविताना सर्व वाहतूक नियमांचे पालन करीन आणि सुरक्षित, जबाबदारीने वाहन चालवीन.

३. मी माझ्या वरिष्ठांच्या आदेशांचे पालन करीन आणि मला सोपविलेल्या कामांची प्रामाणिकपणे व वेळेत पूर्तता करीन.

४. मी कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन, मद्यपान करून वाहन चालविणे किंवा शासकीय नियमांचे उल्लंघन करणार नाही.

५. मला दिलेल्या वाहनाची योग्य काळजी घेईन व त्याची नियमित देखभाल करीन.

स्थळ :
दिनांक :

....
अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी